


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९५ वा गुरूवार दि १८ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# महापालिका निवडणुकीसाठी ठाकरेंनी कंबर कसली...

## मनसेसोबतच्या युतीवर सकारात्मक संकेत शाखाप्रमुखांना दिला कानमंत्र

वृत्तसंस्था/मुंबई

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर उद्धव ठाकरेंनी आता कंबर कसली आहे. पक्षाची संघटनात्मक रणनीती आखण्यास त्यांनी सुरुवात केल्याचे दिसत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते पक्षाचे नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. आज त्यांनी मुंबईत शाखाप्रमुखांची बैठक घेतली यामध्ये ठाकरेंनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकीसाठी उपस्थितांना कानमंत्र दिला आहे. जो आपल्यासोबत येईल त्याला शंभर टक्के साथ द्या, मुंबईतील सर्व वॉर्डमध्ये तयारी ठेवा, युतीचा निर्णय आम्ही घेऊ, असे ठाकरेंनी म्हटले आहे उद्धव ठाकरेंनी शिवसेना भवनात शाखाप्रमुखांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी ठणकावून सांगितले की, जे सोडून गेले त्यांना पुन्हा उमेदवारी मिळणार नाही. मात्र जो आपल्यासोबत येईल त्याला शंभर टक्के साथ द्या. मनसेसोबत सध्या चर्चा सुरु आहे, युतीबाबत आम्ही निर्णय घेऊ. दोन ठाकरेंच्या मनोमिलनाबाबत बोलताना ते म्हणाले, २० वर्षांनंतर दोन्ही भाऊ एकत्र आलो आहोत, मनसेसोबत युतीची चर्चा सुरू आहेच. तुम्ही सर्व वॉर्डमध्ये आपल्या पक्षाची तयारी ठेवा, लोकांच्या संपर्कात राहा, दुबार मतदानावर लक्ष द्या. फार तर फार १०० दिवस उरलेत कामाला लागा, असे आदेशही उद्धव ठाकरेंनी दिले आहेत. तर ठाकरेंनी यावेळी विरोधकांनाही लक्ष्य केले. विरोधकांना आपल्याला या निवडणुकीत गाडायचं आहे, भाजपने आपला पक्ष आणि चिन्ह चोरले. भाजप आणि मुख्यमंत्री आपल्यावरच टीका का करतात? लक्षात घ्या, टीकेला फक्त ठाकरेच लागतात याचे महत्व समजून घ्या, असे उद्धव ठाकरे म्हणाले. महापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्ष कामाला लागल्याचे चित्र आहे. मात्र निवडणुका आणखी चार महिन्यांनी लांबणार आहेत. जानेवारीत निवडणुका होणे अपेक्षित आहे. मात्र पक्षबांधणीच्या कामांना आतापासूनच वेग आला आहे. दरम्यान, ठाकरे बंधूंच्या भेटी वरचेवर वाढल्या आहेत, कटूता दूर होऊन त्यांचे संबंध घट्ट होत असल्याचे चित्र आहे, त्यामुळे युतीच्या चर्चांना बळ मिळत आहे. गेल्या दोन महिन्यात तब्बल चार वेळा दोन्ही बंधूंमध्ये भेट झाली आहे.



गेल्या आठवड्यात राज ठाकरेंच्या शिवतीर्थ निवासस्थानी दोन्ही बंधूंची भेट झाली. यावेळी दोघांमध्ये दीर्घ चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामुळे राजकारणात काय नवे घडणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

# भाजपच्या अध्यक्षपदासाठी महाराष्ट्रातून शॉकिंग नाव चर्चेत संघाची ती इच्छा पूर्ण होणार?

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

पितृपक्ष संपल्यानंतर भारतीय जनता पक्षाला राष्ट्रीय अध्यक्ष मिळू शकतो. बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी च्या सुमारास सत्ताधारी पक्षाला नवा अध्यक्ष मिळण्याची दाट शक्यता आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीनंतर भाजपमधील अंतर्गत गणितं बदलली आहेत. आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन दोघेही ओबीसी आहेत. त्यामुळे आता भाजपकडून ब्राह्मण चेहऱ्याला अध्यक्षपदी संधी देऊ शकतो. दलित समाजातून आलेल्या रामनाथ कोविंद यांना भाजप नं राष्ट्रपती पदावर संधी दिली. विद्यमान राष्ट्रपती आदिवासी आहेत. त्यामुळे आता भाजपच्या अध्यक्षपदी ब्राह्मण नेत्याला संधी मिळावी अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची इच्छा आहे. भाजप आणि संघाच्या निकटवर्तीयानं आणि विश्वसनीय सुत्रानं एनबीटी ऑनलाईनला भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतीपदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. त्यानंतर राधाकृष्णन उपराष्ट्रपती झाले. यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदासाठीची जातीय गणितं बदलली आहेत. गेल्या काही दिवसांत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या किमान दोनदा बैठका झाल्या आहेत. त्यातील घडामोडी पाहता पक्ष आता राष्ट्रीय अध्यक्षपदावर ब्राह्मण चेहऱ्याला संधी देईल, असं भाजप आणि संघाशी संबंधित सुत्रांनी सांगितली आहे. संभाव्य ब्राह्मण चेहऱ्यांमध्ये विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचं नाव आघाडीवर आहे. ब्राह्मण नेत्याकडे अध्यक्षपद जावं अशी संघाची इच्छा आहे. त्यामुळे नड्डा अध्यक्ष पदावर कायम राहू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याशी नड्डा यांचा उत्तम समन्वय आहे. भाजपच्या घटनेनुसार, कोणत्याही व्यक्तीला कमाल दोन टर्म अध्यक्षपदी राहता येऊ शकतं. तांत्रिकदृष्ट्या नड्डा यांचा एकच कार्यकाळ झाला आहे. आधी ते कार्यकारी अध्यक्ष राहिले. मग त्यांना जवळपास दीड वर्षांचा कार्यकाळ विस्तार मिळाला. नड्डा राजीनामा देतील आणि मग त्यांचीच औपचारिक निवड होईल, याची शक्यता अधिक असल्याचं सूत्र सांगतात.



च्या अध्यक्ष पदासाठी चर्चेत असलेल्या ब्राह्मण चेहऱ्यांमध्ये राज्यसभेचे खासदार दिनेश शर्मा यांच्याही नावाचा समावेश आहे. ते उत्तर प्रदेशचे आहेत. राज्यात त्यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवलं आहे. संघातून भाजपमध्ये सक्रिय झालेल्या नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. पक्ष संघटनेत त्यांनी राष्ट्रीय उपाध्यक्षपद भूषवलं आहे. गुजरातमध्ये पक्षाचे प्रभारी महासचिव म्हणून काम केलं आहे. लखनऊचे महापौर राहिलेल्या दिनेश शर्मा यांचं नाव अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहे.

# ...महिला सुरक्षेचा न्याय...

## संपादकीय लेख

महिलांवरील लैंगिक छळाच्या कायद्याचा उद्देश त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षा पुरवणे हा असून, राजकीय पक्षांच्या कार्यालयांना ङ्कामाच्या ठिकाणाफ्ची व्याख्या लागू होणार नाही. या सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे पडसाद उमटू लागले आहेत. एका क्षेत्रात कायद्याचा उदार अर्थ लावून महिला सुरक्षेला बळकटी देणारा आणि अन्य क्षेत्रांत मात्र दुर्लक्ष करणारा हा निर्णय ठरणार नाही ना, अशी चर्चा यानिमित्ताने सुरू आहे. सुमारीकरणाचा संसर्ग सर्वच क्षेत्रांत आहे. राजकारण त्यातून सुटलेले नाही. केवळ आरोप-प्रत्यारोपांवर न थांबता थेट चारित्र्यहननाचे प्रकार घडू लागले आहेत. देशभर कित्येक महिलांना याचा फटका बसला आहे. बसत आहे. महिलांच्या चारित्र्याच्या रक्षणाचा मुद्दा आजचा नाही. यावर सतत चर्चा होत असते आणि विविध माध्यमांतून महिलांना संरक्षण देण्याचा; संरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न होत असतो. शिवाय विपरीत काही घडले, की अशा मुद्द्यावर प्रसारमाध्यमांमधून तेच ते दळण दळले जाते. परिणामी महिलांच्या वाट्याला विलक्षण अवघडलेपण येते. राजकीय पक्ष, त्यांचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे संबंध मालक-कर्मचाऱ्यांसारखे नसतात, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. राजकीय पक्षांची रचना आणि कार्यपद्धती रोजगारापासून भिन्न असल्याने राजकीय पक्षांना ङ्पॉशफ कायद्यातंर्गतची तक्रार समिती बंधनकारक नाही, असे निरीक्षण केरळ उच्च न्यायालयाने नोंदविले होते. रोजगार आणि वेतन देणाऱ्या संस्थांपुरती मर्यादित निकषाच्या या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. संकुचित चौकटीमुळे; विशेषतः चित्रपट, प्रसारमाध्यमे आणि राजकीय क्षेत्रात ङ्पॉशफ गैरलागू ठरत असल्याचा युक्तिवाद विशेष रजा याचिकेत होता.



सरन्यायाधीशांसह तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हे अपील फेटाळले. केरळ उच्च न्यायालयाचा निकाल त्यामुळे कायम राहिला. एखादी व्यक्ती राजकीय पक्षाशी जोडली जाते, तेव्हा ती नोकरी नसते. त्यात रोजगार किंवा वेतनाचा समावेश नसतो. राजकीय पक्षांचे कामाचे ठिकाण हे या कायद्यांतर्गत आणता येणार नाही, ही भूमिका सर्वोच्च न्यायालयाने घेतली. राजकीय पक्षांना ङ्पॉशफ कायदा लागू केल्यास त्यातून ब्लॅकमेलचे प्रकार वाढतील. यामुळे राजकीय प्रक्रिया बाधित होऊ शकते, हे सर्वोच्च न्यायालयाचे मत आहे. अर्थात, महिला सुरक्षितता सर्वोच्च असल्याने पक्षांतर्गत स्वतंत्र तक्रार यंत्रणा स्थापून अशा प्रकरणांचा निष्पक्ष निपटारा करण्याची तयारी राजकीय पक्षांनी दाखविली तर ते नक्कीच पुढचे पाऊल ठरू शकेल.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कायद्याचा धाक हवा!

लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये मुद्दा कायदा कठोर करण्याचा, शिक्षेच्या तरतुदीचा किंवा तिच्या अंमलबजावणीचा नसून कायद्याच्या धाकाचा आहे. कायदा कठोर असेल, तर माणसाला लवचिक व्हावे लागते आणि कायदाच लवचिक झाला असेल, तर गुन्हेगार कठोर होतात. कायदे बनवणारे अथवा राबविणा-यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायशास्त्राचा अभ्यास केला, तर अशा समस्यांवर तत्काळ उत्तर मिळेल. केवळ कायदा कठोर करून लैंगिक अत्याचाराच्या दुष्टचक्रातील पीडित व्यक्तीला मुक्ती मिळणार नाही.

लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आलेला पॉक्सो कायदा आता आणखी कडक करण्यात आला आहे. या कायद्यातील सुधारणांना केंर्द्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून त्यानुसार आता बालकांचे लैंगिक शोषण करणा-या गुन्हेगारांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. कठुआमधील आठ वर्षाच्या मुलीची सामूहिक बलात्कारानंतर हत्या करण्यात आली होती. या प्रकरणानंतर बलात्कार प्रकरणात फाशीची शिक्षा देणारा कठोर कायदा करावा, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली होती. केंद्र सरकारने कायद्यात बदल करण्यापूर्वी राजस्थान व मध्य प्रदेश सरकारने १२ वर्षाखालील मुलींवरील बलात्कार प्रकरणात मृत्युदंडाची शिक्षा देणारा कायदा मंजूर केला होता. त्यानंतर आता केंद्र सरकारने स्वागतार्ह पाऊल उचलत पॉक्सो कायदा आणखी कठोर केला आहे. बालकांचे लैंगिक शोषण करणा-या गुन्हेगाराला फाशीची शिक्षा देण्याची तरतूद पॉक्सो कायद्यातील नव्या दुरुस्तीने केलेली आहे. समाजातील हिंसकता व लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वेगाने वाढत असताना अशा कठोर कायद्याची गरज होती. पण ते पुरेसे नाही. कारण शेकडो वर्षापासून मुली-महिलांचे लैंगिक शोषण होत राहिले आहे आणि त्याला पायबंद घालण्यासाठी विविध उपाय योजले गेले आहेत. पण, त्यात घट होण्यापेक्षा अशा घटना वाढत असल्याचा अनुभव आहे. मग कायद्यात कुठे त्रुटी राहिल्या, त्या शोधून पर्याय शोधायला हवेत. ते शोधताना आधीचे उपाय कुठे व का निकामी ठरले, तेही बारकाईने तपासणे आवश्यक आहे.

उत्तर प्रदेशातील उन्नावमधील तरुणीवर बलात्कार आणि तिच्या वडिलांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याचे प्रकरण आणि जम्मूतील कठुआ येथील आठ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार, हत्या या दोन प्रकरणांनी काही महिन्यांपूर्वी संपूर्ण देश ढवळून निघाला होता. या दोन्ही प्रकरणात पोलीस यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे त्या त्या राज्यातील सरकारांवर चौफेर टीका झाली. ही दोन्ही प्रकरणे निश्चितच मानवतेला काळिमा फासणारी होती, याबाबत कुणाचेही दुमत नाही. कठुआ प्रकरणातील आरोपींनी केलेले क्रौर्य हे एका धर्माची बाजू उचलून धरण्यासाठी केले, असा तर्क देऊन आपली नैतिक जबाबदारी टाळता येणार नाही. पण दोन्ही प्रकरणात आरोपींना अटकेसाठी झालेल्या उशिरासाठी कोणत्याही स्थितीत राज्य सरकारला जबाबदार धरता येणार नाही. त्यासाठी पोलीस यंत्रणा जबाबदार आहे. कारण सरकार रस्त्यावरून उतरून हातात दंडुका घेऊन कायदा सुव्यवस्था बिघडवणा-या आरोपींना वठणीवर आणू शकत नाही. त्यासाठी शेवटी पोलीस यंत्रणेला तत्पर राहावे लागणार आहे. हेही विसरता येणार नाही. पोलिसांवर जर सरकारने कारवाई न करण्यासाठी दबाव आणला असेल अथवा तसे निर्देश दिले असतील, तर राज्य सरकारला दोष देता येईल. पण प्रत्येक प्रकरणात सरकार हस्तक्षेप करून स्वत: तपासाची सूत्रे हातात घेऊ शकत नाही.

केंद्र सरकारने पॉक्सो कायदा आणखी कठोर करताना फाशीच्या शिक्षेची तरतूद केली. पण, ही तरतूद निर्भयाच्या प्रकरणानंतर नवा कायदा करताना का झाली नव्हती? तेव्हाच इतकी कठोर तरतूद करण्यात काय अडचण होती? आजच्या पेक्षा तेव्हा अशा गुन्ह्यांचा अधिक सखोल विचार व ऊहापोह झाला होता. पण, न्या. वर्मा समितीने जो मसुदा तयार केला, त्यातून गुन्हेगाराला कठोर शिक्षा देण्याविषयी लवचिकता का म्हणून ठेवली होती? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

खरे म्हणजे कायद्याचा धाकच गुन्हेगारांना उरला नाही म्हणून अशा सुधारणा कराव्या लागतात. बलात्कारच नव्हे, तर कुठल्याही गंभीर गुन्ह्यासाठी जो दोषी ठरला आहे, त्याला इतकी कठोर व निष्ठूर शिक्षा झाली पाहिजे, की ती नुसती बघूनही गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांच्या मनाचा थरकाप उडाला पाहिजे. तशी कल्पना ज्याच्या मनात येऊ शकते, त्यालाही नुसत्या कल्पनेनेच शिक्षेचे भय वाटले पाहिजे. ते आजकाल उरले नव्हते. त्यामुळेच पॉक्सो कायदा आणखी कठोर करण्याचा केंद्राचा निर्णय स्वागतार्ह मानायला हवा.

लैंगिक अत्याचार ही सामाजिक किड आहे. यातून फार गंभीर स्वरूपाच्या समस्या निर्माण होतात अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. तरीही लैंगिक अत्याचार समाजात वारंवार घडत आहेत. लैंगिक अत्याचार हा फार मोठा गुन्हा आहे. खरे तर यात पीडित व्यक्तीला न्याय मिळायलाच हवा. कारण ज्याच्यावर अत्याचार होतो. असहायतेचा फायदा घेतला जातो. ती व्यक्ती जगासमोर आपले दु:ख मांडू शकत नाही. यातील कोणी कोमात जाते, तर कोणाला समाज क्षणोक्षणी दूषणे देत जगू देत नाही. त्या व्यक्तीला जिथे वास्तव्य करावे लागते तिथे तिचे जगणे कठीण होऊन जाते. यापेक्षा मरण बरे अशा टोकाची अवहेलना तिला सहन करावी लागते. गुन्हेगाराला जात-धर्म असू शकत नाही. त्याला कशी शिक्षा होईल. याचा पुरेपूर प्रयत्न सर्वच समाजांनी करावा. कोणत्याही प्रकरणात पुरावे आणि साक्षीदार यांच्या आधारे शिक्षा ठरत असल्याने ही पद्धती वेळ खाऊ आहे. अनेकदा अशा प्रकरणात चांगल्या वकिलांची सेवा घेतल्याने बलात्काराचा आरोपी सुटतो. शिवाय आपली बदनामी होते हे गृहीत धरून काही मायबाप घरदार सोडून दुसरीकडे राहायला जातात. खटलाही मध्येच सोडून देतात. आरोपी मात्र पुराव्याअभावी सुटतात. सगळीकडे तेच हाल. आरोपी हा आरोपीच असल्याने त्याच्याकडे वय, लिंग, जात, धर्म यानुसार पाहू नये. जेवढा बदमाश गुन्हा करणारा असतो, त्याहीपेक्षा जास्त बदमाश गुन्ह्याला साथ देणारा असतो. हे विसरता कामा नये. खरेतर न्याय करताना लैंगिक अत्याचार करणा-या नराधमाला झाडाला बांधून ठेवावे. अन्न-पाण्याविना तडफडायला लावावे



किंवा जनतेसमोर खुलेआम फाशी द्यावी. जेणेकरून कोणताच नराधम असे राक्षसी कृत्य करणार नाही. पण आपण संविधान, देव, अल्लावर विश्वास ठेवत असल्याने त्यांच्या न्यायाची प्रतीक्षा करत जगतो. या कालावधीत नराधमांची ताकद वाढवतो. म्हणूनच पुढील काळात असंख्य नराधम तयार करतात. म्हणून असे नराधम वेळीच समाप्त व्हावेत आणि त्यांची पिल्लावळ तयार होणार नाही, याची काळजी पॉक्सो कायदा कठोर करताना घेतलेली दिसते.

सामाजिक स्थितीत केवळ कायदे कठोर करून परिस्थिती बदलत नाही. आपल्याकडील मुख्य समस्या पोलीस यंत्रणेतील सुधारणा ही आहे. पोलिसांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवणे, अद्ययावत तंत्रज्ञान वापरून तपास करणारे निष्णात दल घडवणे, साक्षीदारांना सुरक्षा पुरवण्याची हमी, लोकसंख्येच्या प्रमाणात न्यायालयांची संख्या, तपासात मुद्दाम त्रुटी ठेवणा-या पोलिसाबरोबरच त्याच्या वरिष्ठांवरही कडक कारवाईची शिफारस अशा अनेक सुधारणांची गरज आहे. खोट्या तक्रारी दाखल केल्यास तक्रारदाराला जबर शिक्षा देणारी सुधारणा, तर त्वरित होण्याची गरज आहे. आर्थिक भ्रष्टाचार करणा-यांच्या जप्तीच्या कायद्यालाही हेच तत्त्व लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाने फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केल्यानंतरही न्यायालयात खेळ चालविला जातो. जो मुंबई बॉम्बस्फोट घडवून शेकडो माणसांच्या हत्येला कारणीभूत होता, त्या याकूब मेमनच्या बाबतीत दिसून आला. तो गुन्हेगारी प्रवृत्ती जोपासणा-यांना प्रोत्साहन देणारा असतो. यात गुंतलेल्या तमाम कायदे पंडितांनी आपल्या कृतीतून गुन्हेगारांना दिलासा व हिंमत देण्याचे काम केल्याचे हे उदाहरणे आहे. कारण अशा कायदे पंडितांमुळेच आपल्याकडे सुप्तावस्थेतील गुन्हेगारांची जोपासना झाल्याचे दिसते. निर्भयावर बलात्कार व नंतर तिच्या देहाची झालेली विटंबना, काही कायदे पंडितांना विचलित करत नाही. कारण, तेव्हा त्यातल्या गुन्हेगारांना फाशी देण्यातली अमानुषता अशा कायदे पंडितांना सतावत होती. पण, निर्भया किंवा तशा मुली, महिलांना ज्या यातना सहन कराव्या लागतात, त्याविषयी कुठली संवेदना दिसत नाही, ही खरी समस्या आहे. अशा कायदे पंडितांबाबत काही निर्णय घेता येईल का हे पाहणेही गरजेचे आहे.

लैंगिक अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये मुद्दा शिक्षेच्या तरतुदीचा किंवा तिच्या अंमलबजावणीचा नसून कायद्याच्या धाकाचा आहे. कायदा कठोर असेल, तर माणसाला लवचिक व्हावे लागते आणि कायदाच लवचिक झाला असेल, तर गुन्हेगार कठोर होत जातात. गावातील महिलेवर अत्याचार करणा-या रांझे पाटलाचे हातपाय तोडून महाराजांनी दिलेली शिक्षा, तशा प्रवृत्तीच्या मनाचा थरकाप उडवणारी होती. म्हणून शिवकालात महिला-मुलींना सुरक्षेची हमी मिळाली होती आणि आज तिचाच दुष्काळ पडल्याचे जाणवत आहे. अशावेळी कठोर केलेला पॉक्सो कायद्यानुसार एखाद्या आरोपीला तत्काळ शिक्षा झाली तरच पीडित व्यक्तीला न्याय मिळाल्याचा विश्वास दिसून येईल. कायदे बनवणारे अथवा राबविणा-यांनी फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यापेक्षाही छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायशास्त्राचा अभ्यास केला, तर अशा समस्यांवरचे उत्तर मिळायला वेळ लागणार नाही. केवळ कायदा कठोर करून लैंगिक अत्याचाराच्या दुष्टचक्रातील पिडीत व्यक्तीला मुक्ती मिळणार नाही.

# आर्थिक आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज

सांपत्तिक स्थितीचा सातत्याने आढावा घ्या, नवे कर्ज घेणे सध्या टाळा संध्यानंद.कॉम संकटे फक्त कसोटी पाहण्यासाठी येतात असे नाही. या काळात आपल्या धैर्याची परीक्षा होते आणि आपण कोठे आहोत हे समजते. संकटे मोलाचे धडेसुद्धा देतात. कोरोना महामारीमुळे गेल्या दोन वर्षांत आपल्याला आरोग्याचे महत्व समजले आणि त्याचबरोबर आर्थिक नियोजनाचेही.भारतासह सगळ्या जगाची गेली दोन वर्षे कसोटीची गेली. महामारीमुळे पूर्वीचे जीवन बदलून गेले आणि नव्या सवयी आत्मसात कराव्या लागल्या. विद्यमान काळातील जगासाठी कोरोना महामारी हे सर्वांत मोठे संकट ठरले यात शंका नाही. लॉकडाऊनसारख्या कठोर उपायांमुळे अर्थव्यवस्थेची गती मंदावली आणि आता संसर्ग कमी होत चालल्यामुळे व्यवहार पूर्ववत होऊ लागले आहेत. मात्र, त्यांना पूर्ण गती येण्यासाठी आणखी काही काळ जावा लागेल. महामारीच्या काळात अनेकांचे रोजगार गेले आणि काम असलेल्यांना वेतनात कपात स्वीकारावी लागली. एकीकडे वाढती महागाई आणि दुसरीकडे मर्यादित उत्पन्न अशा कात्रीतून आपल्याला मार्ग काढावा लागणार आहे. तुम्हाला वेतन जास्त मिळते की कमी, तुम्हाला रोजगार आहे की नाही, आदी प्रश्न सध्या महत्त्वाचे नसून, आहे त्या पैशांचे व्यवस्थापन कसे करावे हा मुद्दा आहे. त्यासाठी



शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आर्थिकआरोग्यसुद्धा सांभाळावे लागेल. जगण्यासाठी पावलोपावली पैशांची गरज असताना, कोठे तो वाचविता येईल आणि त्याचे नियोजन कसे करता येईल याबाबत अर्थतज्ज्ञ काय सांगताहेत ते बघा.

**सातत्याने आढावा :** आपली आर्थिक-सांपत्तिक स्थिती कशी आहे, आपण कोठे आहोत याचा सातत्याने आढावा घेत राहणे योग्य ठरते. महामारी कमी झाली असली, तरी ती पूर्णपणे संपलेली नसल्याच्या या काळात ते जास्त महत्वाचे ठरेल. महामारीमुळे आपल्याला पैशांचे महत्व समजले आणि अनावश्यक खर्च कसे टाळता येतात हेही लक्षात आले. गेल्या दोन वर्षांतील काळाकडे नजर टाकलीत, तर आपल्या खर्चाच्या जुन्या सवयी बदलल्याचे तुम्हाला जाणवेल. आता आपली बचत आणि खर्चाचा आढवा घ्यावयास हवा. अत्यावश्यक खर्चांनंतर किती बचत करता येईल हे पाहायला हवे. आपल्या खर्चाचा सातत्याने आढावा घेत राहणे हा सध्याच्या स्थितीत सर्वोत्तम मार्ग असल्याचा सल्ला अर्थतज्ज्ञांनी दिला आहे. करमणुकीऐवजी किराण मालावर खर्च करणे सध्या योग्य ठरेल. त्यासाठीच खर्चांचा आढवा घेत राहायला हवा. गरजेपुरता खर्च करण्याची सवय सध्या चांगली ठरेल.

**दीर्घकालीन विचार :** सध्याच्या काळात दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचा विचार करायला हवा. त्यासाठी मोठे खर्च टाळायला हवेत. आपल्या आईचे उदाहरण लक्षात ठेवा. आकस्मिक खर्चाला उपयोगी पडतील म्हणून आपली आई तिच्याजवळची थोडी रक्कमही बाजूला ठेवत असल्याचे तुम्हाला आठवत असेल.पैसा वाचविण्याचे अनेक मार्ग असतात. जेवणाच्या डब्यांची वर्गणी बंद करणे, स्ट्रिमिंग सेवा बंद करणे आणि आप्लालाउड स्टोअरेज सेवा न घेणे हे त्यातील काही. यात थोडा वयाचाही संबंध येतो.


२८ वर्षांचा एखादा तरुण यूट्यूब प्रिमियम, अमेझॉन प्राइम, स्पोटीफाय आणि नेटफ्लिक्सच्या जगात रमतो, तर ४० वर्षांचा एखादा प्रौढ खेळांना प्राधान्य देईल. पण, यात २८ वर्षांच्या तरुणाचा खर्च तिप्पट होतो हे लक्षात घ्या. करमणुकीपासून अगदी लांब राहावे असा याचा अर्थ नाही.

पण, तीन भिन्न स्ट्रिमिंग सेवा चालू ठेवण्यापेक्षा एकच सेवा घेतलीत तरी पैसा वाचतो. असे खर्च कायमस्वरूपी बंद करण्याचीसुद्धा गरज नाही. पण, सध्याच्या काळात त्यावर नियंत्रण मात्र ठेवणे आवश्यक आहे.कर्जांवर नजर ठेवा : सध्याच्या काळात नवे कर्ज घेण्याचे टाळा.आपले उत्पन्न आणि बचत हा मुद्दा यात नाही हे लक्षात घ्या. विचार न करता कर्ज घेतलेत तर काय होते याचे एक उदाहरण बघा. आयटी क्षेत्रातील एका बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणारा ३८ वर्षांचा एक कर्मचारी होता. रोजगार आणि वेतन उत्तम होत पण कमी व्याजदरात मिळणारी आलिशान मोटार खरेदी करण्याच्या मोहात तो पडला. महामारी सुरू होण्यापूर्वी चार महिने हे घडले. पण दुर्दैवाने नंतरच्या दोन महिन्यांत त्याचा रोजगार गेला.

बचत पुरेशी नव्हती आणि मोटारीच्या मासिक हप्त्यांसह अनेक देणी त्याला होती. सोबत घरातील खर्च, वैद्यकीय बिलेसुद्धा होती.

या स्थितीत त्याला खर्च भागविण्यासाठी त्याची आलिशान मोटार विकणे भाग पडले. त्यातून वाईट म्हणजे तो एक वर्षापेक्षा जास्त काळ बेरोजगार राहिला. अगदी शून्य टयांवर मिळाले तरी कर्ज हे कर्जच असते आणि त्याची परतफेड करावीच लागते. त्यामुळे सध्या नवे कर्ज घेणे टाळावे. घ्यावेच लागले, तर कमी व्याजदरावर मिळणाऱ्या कर्जाचा विचार करा.गुंतवणूक सुरूच ठेवा : तुमच्या वेतनातून बचत आणि गुंतवणूक करणे श्नय असेल, तर फारच चांगले. शेअर बाजारातील घडामोडींची फार काळजी न करता भविष्याकडे लक्ष ठेवा. शेअर बाजार खाली गेला असेल तेव्हा त्यात गुंतवणूक करणे म्हणजे पैसा वाढविणे. दीर्घकाळाशिवाय कोणत्याही गुंतवणुकीतून फायदा मिळत नाही हे लक्षात ठेवा. बाजारातील एकच स्थिती कायम राहत नसल्यामुळे तुम्ही गुंतवणूक चालू ठेवणे योग्य ठरेल.

# स्वप्नाचा दरवळ




कॉलेजमध्ये जाण्यासाठी बसस्टॉपवर उभी होते. बाजूला एक विद्यार्थी उभा होता. स्वतःहूनच माझ्याजवळ आला आणि बोलू लागला. त्याचे नाव संतोष. त्याच्या बोलण्यातून मला अनेक गोष्टी कळल्या जसे त्याला वडील नाहीत, आई धुणं-भांड्याची कामे करते. त्याला दहावीत सत्तर टक्के गुण मिळाले आहेत. तो कोणत्या तरी लेखकाकडे लेखनिक म्हणून काम करतो आहे. बोलता बोलता तो एक गोष्ट बोलून गेला की, त्याला डॉक्टर व्हायचे आहे म्हणून त्याने सायन्स घेतले आहे. इतक्यात बस आली.आम्ही बसमध्ये चढलो. साहजिकच मी त्याचे तिकीट काढले. तेव्हा त्याने नाराजी व्यक्त केली. मी त्याला म्हटले, ङ्कतू जेव्हा कमवायला लागशील तेव्हा माझे टिकीट काढ. माझ्या मनात आले की, ज्या मुलाला दहावीत केवळ सत्तर टक्के गुण मिळाले आहेत, त्याला बारावीत असे कितीसे गुण मिळणार? आणि ज्याची आर्थिक परिस्थिती इतकी बिकट आहे, तर तो कसा काय डॉक्टर बनणार? पण त्याच्या अर्धोन्मीलित स्वप्नाला मी मनोमन शुभेच्छा दिल्या.

दहा-बारा वर्षांनंतरची गोष्ट.एकदा मी बसस्टॉपवर उभे होते. अचानक एक कार माझ्या बाजूला येऊन थांबली आणि खिडकीची काच खाली झाली. एका मुलाने हाक मारली,

मॅडम या आत कुठे सोडू? इतकं बोलून तो थांबला नाही. स्वतः उतरून हसूनच त्याने माझ्यासाठी दार उघडले. तो संतोष होता. त्याने एका हॉटेलसमोर गाडी थांबवली. आम्ही चहा घेतला. साहजिकच बिलाचे पैसे त्याने दिले.

चहा घेताना त्याने स्वतःविषयी अनेक गोष्टी सांगितल्या, किती कष्टपूर्वक बारावीत ब्यान्नव टक्के गुण मिळवले. एका सामाजिक संस्थेने कसे त्याचे डॉक्टरकीचे शिक्षण पूर्ण केले. आता त्याला एका शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून नोकरी मिळाली त्याचा थोडक्यात इतिहास कथन केला. स्वप्नातल्या कळ्या सुंदर असतात. पण फुललेल्या स्वप्नाचा दरवळ काही वेगळाच असतो, हे मात्र त्यादिवशी मी संतोष भेटल्यावर अनुभवले.

# जब भी ये दिल उदास होता है!

आदमीमधील महंमद रीच्या आवाजातील शकील बदायुनी यांचे आज पुरानी राहोंसे, कोई मुझे आवाज न दे हे गीत अतिशय वेगळे होते. एक सुंदर, शुद्ध कविता, जीवन बदलणारे तत्त्वज्ञान आणि अतिशय भेदक तर्काचे ते मिश्रण समजायलाही एका क्षमतेची गरजच होती. ते प्रेयसीच्या प्रतारणेमुळे आलेले तात्कालिक वैराग्य नव्हते आणि तरीही ते एक ल्मी गाणेच होते. पुढच्याच ओळीने लक्षात येते की ते गाणे एका हरलेल्या प्रेमिकाचा विलाप आहे.

**दर्दमें डूबे गीत न दे, गमका सिसकता साज न दे**

पण शकील बदायुनी यांनी गाण्याची उंची खूप वरची ठेवली होती. त्यात नौशादसारख्या सिद्धहस्त संगीतकाराने मूळ कवितेला आपल्या सुरांनी आणि संगीताने प्राण देऊन जिवंत केले होते. अनुभवाने पोळलेला तो प्रेमी केवळ तक्रार करत नाहीये, त्याने खूप चिंतन केले आहे. ज्या सुरात माझा भूतकाळाच्या आठवणी होत्या ते स्वर मी विसरलो आहे. माझ्या जीवनासाठी आता मी वेगळेच ध्येय निश्चित केले आहे. कालच्या मनाच्या विसाव्याच्या जागा मी पूर्णतः विसरलो आहे. आज माझ्या मनात ती प्रिय व्यक्तीही नाही, ते जुने हृदयही माझ्याकडे नाही! जीवनाचे तत्त्वज्ञानही बदलले आहे असे तो म्हणतो. यापुढचे वाक्य आगळाच विचार मांडते. कवी म्हणतो, मी या सर्व गुन्हांपासून आता दूर आलो आहे. दीन-धरम आणि दिल व सनमम यांना गुन्हे म्हणणारा असा कवी विरळाच ना!

**बीते दिनोंकी याद थी जिनमें, मैं वो तराने भूल चुका,**
**आज नई मंजिल है मेरी, कलके ठिकाने भूल चुका,**
**न वो दिल न सनम, न वो दीन-धरम,**
**अब दूर हूँ सारे गुनाहों से..!**

कवीची ही मनस्थिती काही वेगळीच आहे. त्याच्या चिंतनाने त्याला केवळ विरक्त, उदास, तुटक केले नाही तर त्याला एक वेगळेच आत्मभान प्राप्त झाले. तो म्हणतो, आज मुझे अपनेही दिलमे एक नया इन्सान मिला. ही स्वतःचीच नवी ओळख होण्याची घटना प्रेम, ताटातूट, विश्वासघात यापलीकडची आहे! त्यात नुसते चिंतन नाही, आत्मसाक्षात्कार आहे! मला जुन्या



हिंदी कवींचे हे वेगळेपण ार भावते. ते कशातूनही काहीही निर्माण करू शकतात.

**जीवन बदला दुनिया बदली,**
**मनको अनोखा ग्यान मिला,**
**आज मुझे अपनेही दिलमें,**
**एक नया इनसान मिला,**
**पहुँचा हूँ वहाँ, नहीं दूर जहाँ,**
**भगवान भी मेरी निगाहोंसे**

हा तर क्लायमॅक्स! आता मी तिथे पोहोचलो आहे जिथून परमेश्वरही दूर नाही. जीवनातील अंतिम सत्य समजण्याचा तो क्षण आता माझ्या टप्प्यात आला आहे. हे असे सांगणे, तेही कवितेत सांगणे ही एक कमालच होती! आणि कहर म्हणजे हिंदू तत्त्वज्ञानातील ही परमोच्च अवस्था इतक्या यथार्थपणे कुणी वर्णन करावी तर शकील बदायुनी, नौशाद आणि महंमद री यांनी! हेच आमच्या सिनेसृष्टीचे, अर्थात जुन्या सिनेसृष्टीचे, वेगळेपण होते! यापुढचे कडवेही असेच. ते एका निर्णयामुळे आलेल्या लौकिक बदलाचे, परिवर्तनाचे चित्र आहे की एका अध्यात्मिक अवस्थेचे, निवार्णाचे, मुक्तीचे वर्णन आहे ते कळू नये इतके ते शकीलजींनी मनस्वीपणे लिहिले आहे

**टूट चुके सब प्यारके बंधन,**
**आज कोई जंजीर नहीं**
**शीशा-ए-दिलमें अरमानोंकी,**
**आज कोई तस्वीर नहीं**
**अब शाद हूँ मैं, आजाद हूँ मै,**
**कुछ काम नही है आहोसे.**

सलाम शकीलसाहेब तुम्हाला! मनाला मागे ओढणारे सगळे पाश तुटले, पायातील बेडया निखळल्या, मनाच्या आरशात उमटणा-या अभिलाषा, वासना, पुसल्या गेल्या, सगळे आनंदमय झाले, मी मुक्त झालो, आता या श्वास-उच्छवासाचे प्रयोजनच राहिले नाही! बाप रे! कसले हे वर्णन? शकीलसाहेब तुम्ही एक सिनेगीत लिहिताय, लक्षात आहे ना? असे विचारावेसे वाटते! पण असली जबरदस्त मनोहारी किमया हे जुने शायरच करू जाणे. कधी कधी मनाची अवस्था आपल्यालाच कळत नाही. काही कारण असो की नसो, मन उदास राहते. कुठेच चित्त लागत नाही. एक हरवलेपण, एक हुरहूर सगळ्या भावविश्वाला घेरून उरते. एखादा चेहरा मनाच्या आकाशात मध्येच तरळून जातो. श्रावणात भरून आलेल्या आभाळातील एखाद्या ढगात एखाद्या आकृतीचा भास व्हावा तसा. ही अवस्था वर्णन करायला कवी तर गुलजारच लागणार ना? चित्रपट होता सीमा (१९७१) अर्थात हा सीमा तू प्यार का सागर हैंवाला सिमा (१९५५) नव्हता हं! रीने खास या गाण्यासाठी वेगळा आवाज लावला होता आणि सोबत होती अगदी निवडक गाणे गायलेली शारदा.

**जब भी ये दिल उदास होता है**
**जाने कौन आस पास होता है..**

गुलजार म्हणजे प्रतिमांची रेलचेल आणि चपखल उपमांबरोबरच कधीकधी अगदी विचित्र उपमांचासुद्धा धीट वापर यांचे अजब, पण बांधून ठेवणारे, नजरबंदी करणारे, आंबटगोड मिश्रण! जिथे ओठ चुपचाप बोलतात आणि डोळे आवाज देतातअसे ते गुलजारसाहेबांचे जग! तसे किती विचित्र पण मग मनाच्या अंतर्मुख, स्वमग्न, मुग्धमधुर भावावस्थेचे वर्णन दुसरे करणार तरी कोण?

**होंठ चुप चाप बोलते हो जब**
**साँस कुछ तेजतेज चलती हो**
**आँखें जब दे रही हों आवाजें**
**ठंडी आहोंमें साँस जलती हो**
**जब भी ये दिल उदास..**

उदास, आत्ममग्न, एकटया प्रेमिकाला सगळे समजते आहे. आपले एकटेपण, तिचे किंवा त्याचे नसणे हेच या रिते करून टाकणा-या उदासीचे कारण आहे हे समजूनही त्याला मान्य करायचे नाही. त्याला जाने कौन? म्हणून स्वतःसाठीही सगळे तसेच संदिग्ध ठेवायचे आहे. खरे तर हे एकटेपण तो मुद्दामच रेंगाळू देतोय. जयकिशन यांनी चालसुद्धा तशीच लावली आहे-

**आँखोंमें तैरती है तस्वीरें**
**तेरा चेहरा, तेरा खयाल लिये,**
**आइना देखता है जब मुझको**
**एक मासूमसा सवाल लिये,**
**जब भी ये..**

तो मनात हे एकाकीपण जपतोय, रेंगाळत अनुभवतोय, कारण त्याला माहीत आहे प्रेमाची अभिव्यक्ती झालीच नाही. भेट ठरलीच नाही. मग ही उदासी जाणार तरी कशी? तरीही कसे कुणास ठावुक भेटीची आस मात्र लागून राहिली आहे. कसली विचित्र प्रसंगरचना करून गुलजार त्यातून अलगद सटकतात आणि एखाद्याने मधमाश्यांच्या मोहोळातून एकाही माशीचा दंश न होता पोळे काढून आणावे तसा एका सुंदर गीताचा मधुर थेंब ते आपल्या ओठावर ठेवतात पाहा-

**कोई वादा नहीं किया लेकिन,**
**क्यूँ तेरा इंतजार रहता है**
**बेवजह जब करार मिल जाये,**
**दिल बडम बेकरार रहता है**
**जब भी ये..**

पण कधीकधी ही न ठरलेली भेटही होते. दोघे एकमेकांत विरघळून जातात आणि मग प्रत्येक प्रेमकहाणीत, मिलनात आड येणारा जमाना नकोसा होतो. दोघात कुणीच नको, काहीच नको असे होऊन जाते. तीही भावावस्था किती छानपणे वर्णन केलीये राजेंद्र कृष्ण यांनी! सिनेमा-अमरदीप, संगीतकार आपले रामचंद्र चितळकर ऊर्फ सी. रामचंद्र! री आणि आशा या जोडीने ती गोड, स ल प्रेमाची उत्कट अवस्था आपल्या आवाजातून आणि सी. रामचंद्र यांनी वेगवान चाल देऊन व्यक्त केली होती. शब्द होते-

**देख हमें आवाज न देना**
**ओ बेदर्द जमाने, ओ बेदर्द जमाने**
**आज चले हम छोडमके तुझको**
**दुनिया नई बसाने..**

यात पहिल्या प्रेमातील साधे सुंदर पण उत्कट प्रसंग कल्पून कवी किती रोमँटिक चित्र रेखाटतो पाहा

**चमका शामका पहला तारा,**
**गगन दुलारा,**
**सबसे पहले उसने देखा, प्यार हमारा,**
**आनेवाली रात सुनेगी, तेरे मेरे तराने**

टोकाची एकरूपता, एकतानता साधल्यावर प्रेमात खरेच सगळ्या भावभावना, दुःख आनंदाचे सगळे अनुभव एक होऊन जातात.

**दूर कहीं एक पंछी गाये, ये समझाये,**
**प्यार में हो जातें है, अपने दर्द पराये,**
**दिलकी धडम्कन क्या होती है,**
**प्यार करें तो जाने..**
**ओ बेदर्द जमाने**


अशी ही नॉस्टॅल्जिक गाण्यांची अल्लाउद्दिनची रत्नजडित गुहा! त्यात प्रेम, विरह, मिलन, शृंगार, सगळे विपुल पसरले आहे. पण अलीकडे कितीही आत खोल गेले तरी मनाच्या गाभा-यात शब्द घुमतात ते गुलजारचेच-जब भी ये दिल उदास होता है!

# कचरा साफ न करण्याचं क्षुल्लक कारण...

# शिक्षिकेने मात्र विद्यार्थिनींना छडीने बेदम मारलं; प्रशासनाची मोठी कारवाई...

**नागपूर** : शाळा परिसरातील कचरा उचलण्यास मनाई केल्याने शिक्षिकेने दोन विद्यार्थिनींना बेदम मारहाण केली. ही धक्कादायक घटना कोंढाळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाजारगाव येथील जिल्हा परिषद शाळेत घडली. या घटनेने पालकांमध्ये रोषाचे वातावरण आहे. याप्रकरणी पोलिसांनी शिक्षिकेविरूद्ध मारहाणीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मनीषा चौधरी वय ३५ ,असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या शिक्षिकेचे नाव आहे. जखमींमध्ये दहा वर्षीय दोन विद्यार्थिनींचा समावेश आहे.पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, दोन्ही विद्यार्थिनी दहावीत शिकतात. शनिवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास



चौधरी यांनी दोन विद्यार्थिनींना शाळा परिसरातील कचरा साफ करण्यास सांगितले. ङ्हे आमचे काम नाही, असे सांगत दोन्ही विद्यार्थिनींनी कचरा वेचण्यास नकार दिला, यामुळे चौधरी संतापल्या. त्यांनी छडीने दोन्ही विद्यार्थिनींच्या पायावर जबर मारहाण केली. दोघीही अत्याव्यस्थ झाल्या. काही काळ त्यांची शुद्धीही हरवली. सकाळी १० वाजताच्या सुमारास शाळेतील दोन शिक्षकांनी दोघींना घरी सोडले. दोघीही अत्याव्यस्थ बघून पालक घाबरले. त्यांनी शिक्षकांना घटने माहिती विचारली. शाळेच्या मैदानावरील कचरा साफ करण्यास मुलींनी मनाई केल्याने शिक्षिका मनीषा चौधरी यांनी दोघींना छडीने मारहाण केल्याचे पालकांना सांगितले. त्यानंतर दोघींना घेऊन पालकांनी थेट कोंढाळी पोलीस ठाणे गाठले. तक्रार दिली.

त्यानंतर पोलिसांनी दोघींना प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. एकीला उपचारानंतरच सुटी देण्यात आली तर अन्य एका विद्यार्थिनीला नागपुरातील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.पालकाच्या तक्रारीवरुन पोलिसांनी चौधरी यांच्याविरूद्ध अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्याच्या कलम ७५ व मारहाणीचा गुन्हा दाखल केला. ठाणेदार राजकुमार त्रिपाठी या प्रकरणाचा तपास करीत आहे. यापूर्वीही नागपुरातील कपिलनगरमधील एका शाळेत अशीच घटना घडली होती. परंतु हे प्रकरण सामंजस्याने निपटविण्यात आले.

पालकाने पोलिसांत तक्रार दिली नाही.दरम्यान, या घटनेची गंभीर दखल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी घेत चौकशीचे आदेश दिले. प्राथमिक चौकशीत शिक्षिका चौधरी यांनी विद्यार्थिनींना मारहाण केल्याचे समोर आले. त्यानंतर तडकाफडकी चौधरी यांना निलंबित करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

---

# जीवन देणारं पाणी खरोखरच अमृतासारखं आहे गरोदरपणात

## पुरेसं पाणी न प्यायल्यास बाळाचा जीव येईल धोक्यात!

गरोदरपणा महिलांसाठी अनेक आव्हानांनी भरलेला असतो कारण या काळात त्यांना अनेक शारीरिक,भावनिक आणि मानसिक बदलांमधून जावे लागते. अशा परिस्थितीत त्यांच्यासाठी पोषक तत्वांनी समृद्ध अन्न खाणे आणि वेळोवेळी पाणी पिणे खूप महत्वाचे बनते. आपल्या सर्वांना माहित आहे की आपले शरीर घाम, मूत्र आणि आतड्यांद्वारे कचरा बाहेर टाकत राहते, म्हणून शरीरात सतत ओलावा राखण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. म्हणूनच गर्भधारणेदरम्यान हायड्रेटेड राहण्याची गरज आणि पद्धती गायनॅकॉलॉजिस्ट डॉ. संजीवनी टोंगसे यांनी या दोन्ही गोष्टी व्हिडीओच्या माध्यमातून तपशीलवार स्पष्ट केल्या आहेत.

**गरोदरपणात हायड्रेशन का हवे**

गर्भधारणेदरम्यान मळमळ किंवा उलट्या होणे ही एक सामान्य समस्या आहे ज्यामुळे गंभीर डिहायड्रेशन होऊ शकते आणि त्याचबरोबर महिलेचे वजन ५% पेक्षा जास्त कमी होऊ शकते. एवढेच नाही तर आजकाल बद्धकोष्ठतेची समस्या खूप सामान्य आहे. मग जर ती महिला लोह पूरक आहार घेत असेल तर ही समस्या आणखी वाढते. या सगळ्या गोष्टी गर्भाच्या वाढीवर वाईट परिणाम करू शकतात.या कारणास्तव, गर्भधारणेदरम्यान महिलेने किमान ८-१२ ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे.

**डिहायड्रेशनची लक्षणे**

गर्भधारणेदरम्यान महिलेच्या शरीरात पाण्याची कमतरता असेल तर ती पुढील काही लक्षणांद्वारे ओळखता येते.अ. तोंड कोरडे पडणे ब. चक्कर येणे क. गडद पिवळ्या रंगाची लघवी ड. डोकेदुखी.

**डिहायड्रेशन होऊ नये म्हणून उपाय**

डिहायड्रेशनची ही लक्षणे ओळखली पाहिजेत आणि त्यापासून मुक्त होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण यामुळे अम्नीओटिक द्रवपदार्थाचे प्रमाण कमी होऊ शकते आणि अकाली प्रसूती होऊ शकते. त्याच वेळी कॅफिन, साखरयुक्त पेये आणि उच्च-कॅलरीयुक्त पदार्थांचे सेवन



अगदी कमी प्रमाणात करणे गर्भधारणेसाठी सुरक्षित आहे.

**पाण्याला इतर पर्याय**

पाणी हे हायड्रेशनचा प्राथमिक स्रोत असले तरी, त्याशिवाय ताज्या फळांचा रस, हर्बल टी आणि दूध यासारखे काही इतर द्रवपदार्थ घेणे चांगले. त्याच वेळी टरबूज, काकडी आणि संत्री यासारख्या पाण्याने समृद्ध अन्नपदार्थांचे सेवन करत राहिले पाहिजे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ

## जिल्हा स्त्री रुग्णालय येथे थेट प्रक्षेपणाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आज, १७ सप्टेंबर २०२५ रोजी स्वस्थ नारी, सशक्त परिवार या विशेष अभियानांतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम इंद्र येथून थेट प्रक्षेपित करण्यात आला. अभियानाचा शुभारंभ निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये महिलांचे आरोग्य सुदृढ ठेवणे, कुटुंबाची आरोग्यसंपन्नता सुनिश्चित करणे आणि महिला सबलीकरणास चालना देणे हे होते. या कार्यक्रमाला वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा क्षयरोग अधिकारी व नोडल अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, वैद्यकीय अधिक्षक पाटील, नोडल अधिकारी डॉ. पठाण, उप निवासी वैद्यकीय अधिकारी प्रवीण घोंगटे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, मॅट्रन पुजारी, जिल्हा वैद्यकीय व महाविद्यालयीन अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी राजेश धुताडमल यांच्यासह कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, महिला लाभार्थी, तसेच आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रुग्णांना पोषण आहार किट्स वाटप जिल्हा क्षयरोग केंद्र व जिल्हा क्षयरोग धाम, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोगावर उपचार घेत असलेल्या १० रुग्णांना पोषण आहार किट्स मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांच्या पोषण स्थितीमध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामान्य रुग्णालयाचे आहार तज्ज्ञ साहेबराव सोळंकी यांनी केले.

# दत्तपूर येथे सेवा पंधरवडा व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उत्साहात प्रारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर दरम्यान आयोजित सेवा पंधरवडा आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची दत्तपूर ता.जि. बुलढाणा येथे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या उपस्थितीत उत्साहात सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वतः ग्रामसभा घेत दत्तपूर येथील गावकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केले. दत्तपूर हे जिल्हा प्रशासनाचे दत्तक गाव असून या गावाच्या विकासामध्ये जिल्हाधिकारी यांनी व्यक्तिशः लक्ष दिले आहे. या सेवा पंधरवाड्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत शिव, पाणंद रस्त्याचे सर्वेक्षण करण्यात आले व त्याबाबत चावडी वाचनाद्वारे गावकऱ्यांना अवगत करण्यात आले. तसेच जिवंत ७/१२ मोहिमेबाबतही गावकऱ्यांना माहिती देण्यात आली व घरकुलाच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. त्याचबरोबर दत्तपूर ग्रामपंचायतीच्या वतीने दत्तपूर जिल्हा परिषद शाळेला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते साहित्य वितरित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनीही गावकऱ्यांना संबोधित केले व विविध शासकीय योजनांची माहिती दिली. यावेळी दत्तपूर गावचे सरपंच संदीप कांबळे, उपसरपंच जीवन दाभाडे, सदस्य आकाश माळोदे, राहीबाई रमेश जाधव, अनिता गजानन भराड, शीतल समाधान माळोदे, तसेच भागवत वानेरे, ग्रामविकास अधिकारी नितीन इंगळे,तलाठी उषा इंगळे, मंडळ अधिकारी पायघन, सहाय्यक जाधव,पोलीस पाटील श्रीकृष्ण राऊत व भास्कर माळोदे, पोलिस जमादार तायडे, मुख्यध्यापक बबन गोरे, समुदाय आरोग्य अधिकारी अंजली चित्ते, आरोग्यसेवक सचिन चिंचोले, सुनीता वैद्य, गजानन जाधव यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

# राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा येथे शिकाऊ उमेदवारांची भरती....

## पात्र उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागातर्फे सन २०२५-२६ साठी तांत्रिक, व्यावसायिक व आयटीआय उत्तीर्ण कार्यशाळा शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असून २९ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या शिकाऊ उमेदवार भरतीमध्ये मेकॅनिक मोटार व्हेईकल (एमएमव्ही) या पदासाठी पदसंख्या ६० असून आयटीआय मेकॅनिक मोटार व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मेकॅनिक (डिझेल) या पदासाठी पदसंख्या २९ असून आयटीआय मेकॅनिक (डिझेल) व्यवसाय उत्त-र्ीण असणे आवश्यक आहे. मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर (एमव्हीबीबी) या पदासाठी पदसंख्या ३० असून आयटीआय मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इलेक्ट्रीशियन या पदासाठी पदसंख्या २६ असून आयटीआय मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पेंटर या पदासाठी पदसंख्या ६ असून आयटीआय पेंटर व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. टर्नर या पदासाठी पदसंख्या २ असून आयटीआय टर्नर व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वेल्डर या पदासाठी पदसंख्या १३ असून आयटीआय वेल्डर व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वायरमन या पदासाठी पदसंख्या १० असून आयटीआय वायरमन व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग या पदासाठी पदसंख्या ७ असून आयटीआय मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग व्यवसाय उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या पदांसाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे नेमून देण्यात आलेली आहे. या व्यवसायासाठी आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी .. या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. शिकाऊ उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी नोंदणी केल्यानंतर पोर्टलवरील संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांप्रमाणे रा. प महामंडळ (एमएसआरटीसी) बुलढाणा विभाग या आस्थापनेसाठी ऑनलाईन अर्ज करावे. याप्रमाणे ऑनलाईन नोंदणी झालेल्या शिकाऊ उमेदवारांसाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना छापील नमुन्यातील अर्ज भरावे ला-गतील. हे छापील अर्ज आस्थापना शाखा, राज्य परिवहन महामंडळ,




विभागीय कार्यालय, मलकापूर रोड, बुलढाणा येथे दि. १८ सप्टेंबर ते २९ सप्टेंबरपर्यंत सकाळी १० ते दुप-ारी ३ या वेळेत स्वीकारले जातील. या अर्जाची किंमत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ५९० रुपये तसेच मागासवर्गीय शिकाऊ उमेदवारांसाठी २९५ रुपये इतकी असून सदर शुल्क उमेदवाराने राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्टव्दारे या नावाने काढून अर्जासोबत सर्व कागदपत्रासह राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, मलकापूर रोड, बुलढाणा या कार्यालयात दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ५ वाजेपर्यंत सादर करावेत. संकेतस्थळावर जे ऑनलाईन नोंदणी करतील त्याच उमेदवारांना राज्य परिवहन महामंडळ, बुलढाणा विभागामध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून भरती करण्यात येईल. राज्य परिवहन महामंडळ सन २०२५-२६ साठी शिकाऊ उमेदवारांनी अर्ज भरण्याचे आवाहन विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, बुलढाणा यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी निवासी जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार विजय सवडे, वृषाली केसकर, जिल्हा नाझर गजानन मोतेकर इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम १९७० चे कलम, खंड (ड) च्या अर्थानुसार तत्सम नवीन बँक किंवा संबंधित कायद्यान्वये प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्याकडून जमिनीच्या तारणावर कर्ज घेवू शकतात. या तरतूदीप्रमाणे वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळविण्यासाठी जर जमीनी गहाण ठेवायाची असल्यास त्याकरीता जिल्हाधिकारी किंवा शासन यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. तसेच घेतलेल्या कर्जाची परतफेड जर हे जमीन धारक करु शकले नाहीत तर तारण ठेवलेल्या जमीनीची विल्हेवाट लावण्याची मुभा या तरतूदीप्रमाणे बँकांना अन्य वित्तीय संस्थांना देण्यात आलेली आहे. भोगवटदार वर्ग २ ची शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांना पिककर्ज, शेती विकसित करण्यासाठी आवश्यक मध्यम किंवा दिर्घ मुदतीचे तारणकर्ज मिळण्यासाठी या कारणास्तव अडचणी आणु नयेत. तसेच याबाबत कोणतही दिरंगाई अथवा टाळाटाळ करणाऱ्या बँकांविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी परिपत्रकद्वारे बँकांना कळविले आहे.

# बुलढाणा भाजपा कडून विविध सामाजिक सेवा उपक्रमाने मोदीजींचा वाढदिवस साजरा...

## भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, गौमाता पूजन व वैरण वाटप, दिव्यांग विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व माजी सैनिकांचा सन्मान ई सामाजिक सेवा उपक्रम संपन्न....

**जनसंचलन/बुलढाणा**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी म्हणजे सेवा कार्याचे दुसरे नाव होय. देशसेवेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा वाढदिवस आज सर्व भारतभर ङ्कङ्कसेवा पंधरवाडाङ्कङ्क म्हणून साजरा होत आहे, त्यामुळे सामाजिक सेवेतून मिळणाऱ्या शुभेच्छांपेक्षा इतर कोणत्याही मोठ्या शुभेच्छा असू शकत नाही. अश्या सेवाव्रती विश्वनेत्यास आमच्या सामाजिक सेवा कार्यातून आम्ही मन:पूर्वक शुभेच्छा देत आहोत.अशा प्रकारच्या भावना जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या स्वच्छ भारत मिशन या पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेस दुजोरा देत बुलढाणा भाजपने आज सकाळीच बुलढाणा बस स्थानक येथे भाजप जिल्हाध्यक्ष मा.आ.विजयराज शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन झाडू मारून, कचरा उचलून बस स्थानक परिसराची स्वच्छता केली व नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला.भाजपा नेते जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या जनसंपर्क कार्यालय शिवालय येथे आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान केले मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ रक्ताच्या बाटल्या संकलित करण्यात आल्या. मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक एक मधील गौशाला येथे भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे व महिला पदाधिकारी यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करून गाईंना चारा वैरण वाटप करण्यात आला. भाजपा जिल्हा सचिव मुन्नाजी बेडवाल यांचाही आज वाढदिवस असल्याने या निमित्ताने त्यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या उपस्थितीत अपंग व मूकबधिर विद्यालय, बुलढाणा येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाची मेजवानी दिली. भाजपा माजी सैनिक सेल च्या वतीने आज बुलढाणा शहरातील विविध माजी सैनिकांच्या घरी भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे व सैनिक सेलच्या पदाधिकारी यांनी भेटी देऊन त्यांचा सन्मान केला यामध्ये माजी सैनिक शौर्य पदक प्राप्त श्री. रमेश बाहेकर, नरसिंग जाधव, आनंदा इंगळे, आनंद मोरे, हरिभाऊ मानवतकर, अशोक किलबिले, सिद्धेश्वर पडोळ, अभिमन्यू करपे ई माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी भाजपा माजी सैनिक सेल व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्यासह सेवा पंधरवाड्याचे जिल्हा संयोजक चंद्रकांत बर्दे, प्रा जगदेवराव बाहेकर,भाजपा जेष्ठ नेते दीपक वारे, श्री विश्राम पवार सर, बुलढाणा शहराध्यक्ष मंदार बाहेकर, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष विश्वनाथ माळी, भाजपा प्रज्ञावंत सेल जिल्हा संयोजक प्रा.विष्णुपंत पाटील, जिल्हा सचिव अनंता शिंदे, जिल्हा सचिव गणेशसिंग राजपूत, जिल्हा सचिव मुन्नाजी बेंडवाल, बाजार समिती संचालक ऍड सुनील देशमुख, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष विश्वनाथ माळी,महिला मोर्चा प्रभारी सौ सिंधुताई खेडेकर, महिला जिल्हा उपाध्यक्ष सौ उषाताई पवार, महिला जिल्हा सरचिटणीस अलकाताई पाठक, जेष्ठ नेत्या सौ शोभाताई ढवळे, सौ वर्षाताई पाथरकर,सौ प्रीतिताई खंदारे, माजी सैनिक सेल जिल्हा संयोजक अभिमन्यु करपे, सहकार आघाडी जिल्हा संयोजक ऍड मोहन पवार,कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष दत्ता शिंदे,सुधीर भालेराव ,पंजाबराव इलग ,अल्पसंख्याक मोर्चा शहराध्यक्ष मोहम्मद अकिल, सचिन टेंभिकर, प्रा प्रभाकर वारे, अजित गुळवे, भाजयुमो नेते विनायक भाग्यवंत, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस वैभव लाड, प्रतिक राजपूत, बाळू ठाकरे, सचिन सूर्यवंशी, अशोक बाहेकर माजी नगरसेवक मुन्ना बेगाणी, मुकुंदा देशपांडे, मेजर अशोक किलबिले, मोताळा मंडळ अध्यक्ष सचिन शेळके, श्रीकांत घाटे,भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष निलेश मुठ्ठे, नितीन पडोळ, किरण नाईक,विमल बेंडवाल, प्रदीप सोनटक्के, मिलिंद कुळकर्णी, सुनील देवकत्ती, संदीप वानरे, राजू खरात,नितीन श्रीवास,सुनील कुलकर्णी यांसह असंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# सेतू की राहू -केतू?

## अधिवास प्रमाणपत्रासाठी टीसी मध्ये केली खाडाखोड.. २ सेतु केंद्र ६ महिन्यासाठी निलंबित!

**जनसंचलन/बुलढाणा**

अलीकडे सेतू केंद्रात बोगसपणा सुरू असून, हे सेतू की राहू.. केतू ? असा प्रश्न उपस्थित झालाय. दरम्यान अधिवास प्रमाणपत्रासाठी टीसी मध्ये खाडाखोड करणारे २ सेतु केंद्र ६ महिन्यासाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. नागरिकांना शासकीय प्रमाणपत्र तात्काळ मिळावे यासाठी कार्यान्वित सेतू केंद्रामार्फत अनेक खोटी कामे केली जात आहे. बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी अशीच खोटी कामे करणारे २ सेतू केंद्र कायमचे रद्द केले असून आता पुन्हा २ सेतू केंद्रांना ६ महिन्यासाठी निलंबित केले आहे.या धडाकेबाज कारवाईमुळे अवैध व बनावट कागदपत्रा द्वारे खोटी कामे करणाऱ्या सेतू केंद्र चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.बुलढाणा तालुक्यातील सिंदखेड येथील सेतू केंद्र चालक सतीश निंबाजी पानपाटील आणि सावळा येथील भाग्यश्री उत्तम थुट्टे यांनी अधिवास प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन कागदपत्रे अपलोड केली होती. यामध्ये शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रात खाडाखोड केल्याचे समोर आल्याने बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी चौकशी करून दोन्ही सेतू केंद्र रद्द करण्याचा प्रस्ताव बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पाठवला होता. दोन्ही केंद्र चालकांचा बयान बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी घेतला तसेच केंद्र चालक दोषी आढळल्याने त्यांनी एका आदेशान्वये सदर दोन्ही सेतु केंद्र ६ महिन्यासाठी निलंबित करण्यात आले आहे.अशी माहिती उपविभागीय अधिकारी कार्यालयाने आज १७ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता दिली आहे.यापूर्वी बुलढाणा तालुक्यातील माळविहीर येथील गणेश श्रीकृष्ण गुंडकर आणि बिरसिंगपूर येथील विकास शिंदे या दोघांचे सेतू केंद्र कायमचे रद्द करण्यात आले आहे. यासोबतच खोटी कामे करणारे बुलढाणा तालुक्यातील इतर काही सेतू केंद्र चालकावर कारवाई प्रस्तावित असल्याची माहिती मिळाली आहे.




# गुटख्याची अवैध वाहतूक, दोन आरोपींसह गुटखा जप्त

**जनसंचलन/ बुलडाणा**

ग्रामीण पोलिसांच्या पथकाने गुटख्याच्या अवैध वाहतूकीवर कारवाई करीत दोन जणांना अटक केली आहे. ही कारवाई १५ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास साखळी बु फाट्यावर करण्यात आली. यामध्ये एकूण ५ लाख २१ हजार १७० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. त्यामध्ये २ लाख २५ हजार रुपयांचा सुगंधित पानमसाला, ५६ हजार २५० रुपयांची तंबाखूची ५ पोती, ९४ हजार रुपयांचा गुटखा तसेच १ लाख ४६ हजार रुपयांचा अन्य पानमसाला व तंबाखू असा विविध प्रकारचा साठा होता. या प्रकरणी गजानन देवीदास पेहरे (रा. वरुड बु., ता. जाफ्राबाद, जि. जालना) आणि सुनील रामराव वाघ (रा. अमोना, ता. चिखली) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातील (एमएच-२८ बीबी ७०२५) या क्रमांकाचे मालवाहू वाहन जप्त करण्यात आले असून, त्याची किंमत ४ लाख ५० हजार रुपये आहे. अशा प्रकारे पोलिसांनी मिळून ९ लाख ७१ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. ही कारवाई बुलढाणा ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार गजानन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सुरेश मोरे, पोलिस हेडकॉन्स्टेबल कैलास उगले, महादेव इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. या कारवाईमुळे गुटख्याची अवैध वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेंच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८